# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात २ फार्मासिस्टची नियुक्ती करणेबाबत**

**(१) १४९ (१५-०१-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फार्मसी ॲक्ट १९४८ चे उल्लंघन होऊ नये यासाठी व्यापक जनहित लक्षात घेवून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात २ फार्मासिस्टची नियुक्ती करणे गरजेचे असूनही एकच फार्मासिस्ट काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात २ फार्मासिस्ट नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत औषध निर्माण अधिकारी या पदावर १ कर्मचारी करार तत्वावर निवडक प्राथमिक आरोग्य केंद्रांना त्यांच्या कामाचा व्याप लक्षात घेवून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सायखेडा (ता.निफाड, जि.नाशिक) येथील उप आरोग्य केंद्रात आरोग्य सेविका, ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध नसल्याबाबत**

**(२) ९७४ (२२-१२-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायखेडा (ता.निफाड, जि.नाशिक) या १५०० लोकवस्तीचे गाव असलेल्या उप आरोग्य केंद्रात दिनांक ३० मे, २०१४ पासून आरोग्य सेविका, ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध नसल्याने सदर केंद्रात उपचारासाठी येणा-या रुग्णांचे हाल होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उप आरोग्य केंद्रात आरोग्य सेविकास व ॲम्बुलन्स सेवा तात्काळ उपलब्ध करुन द्यावी यासाठी येथील ग्रामस्थांनी व स्थानिक आमदारांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे वारंवार लेखी निवेदने देऊन मागणी केली आहे व यासाठी ग्रामस्थांनी आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने आरोग्य सेविका व ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या कार्यवाहीस होणा-या विलंबाची कारणे वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.

प्रा.आ.केंद्र चांदोरी येथे ॲम्बुलन्स उपलब्ध असून गरजेनुसार सायखेडा येथील जनतेला तिचा लाभ देण्यात येत असून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचे हाल होत नाहीत.
(२) हे अंशतः खरे आहे. ग्रामस्थांनी व स्थानिक आमदारांची लेखी निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि, यासाठी ग्रामस्थांनी आंदोलन केलेले नाही.
(३) तात्पुरती व्यवस्था म्हणून उपकेंद्र चाटोरी येथील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांच्याकडे सायखेडा उपकेंद्राचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. तसेच प्रा.आ.केंद्र चांदोरी येथील ॲम्बुलन्सद्वारे सायखेडा येथील जनतेला तिचा लाभ देण्यात येत आहे.

---

**राज्यात सुमारे १५०० नर्सेची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३) ६८३० (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंडियन नसिंग कॉन्सिलच्या नियमाप्रमाणे शहरामध्ये ३ रुग्णास १ नर्स व ग्रामीण भागात ४ रुग्णास १ नर्स असे प्रमाण निश्चित केले असताना राज्यातील मुंबईतील शासकीय रुग्णालयात २५ रुग्णांना १ नर्स तर ग्रामीण भागात याचे प्रमाण दुप्पट असून राज्यात सुमारे १५०० नर्सेची पदे रिक्त असल्याने कार्यरत असणा-या नर्सेसवर कामाचा अतिभार पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत नर्सेसची एकूण ९४१८ पदे मंजूर असून ८२२९ पदे भरलेली आहेत आणि ११८९ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटीपध्दतीने, शुश्रषा संवर्गातील रिक्त पदे भरण्यात येतात. त्यामुळे कार्यरत पारिचारिकांवर कामाचा अतिभार पडत नाही. तसेच रिक्त पदे पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**शासकीय रुग्णालयातील परिचारिकांच्या मागण्याबाबत**

**(४) ६९३७ (०९-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयातील परिचारिकांनी वेतनवाढ, विविध भत्ते, सुटटया, गणवेश, क्वार्टस, रिक्तपदे इत्यादी मागण्यांबाबत जे.जे. रुग्णालयात राज्यस्तरीय परिचारीका परिषदेचे आयोजन जानेवारी २०१५ मध्ये केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपल्या मागण्या मान्य न झाल्यास, संपावर जाण्याचा इशारा उक्त परिषदेत परिचारीकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिचारीकांच्या मागण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्यापि कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) परिचारीकांची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता महाराष्ट्र नॉलेज कॉरपोरेशन लिमिटेड मार्फत सन २०१४ मध्ये पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. रुग्णसेवा सुरळीतपणे चालू राहण्याकरीता परिस्थितीतीनुसार तात्पुरत्या अस्थाई स्वरुपात नेमणूका करण्यात येतात.

उच्च शिक्षणासाठी तसेच प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांना प्रतिनियुक्ती/अध्यायन रजा नियमानुसार देण्यात येत असून परिचारीकांच्या बदल्या संदर्भात नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

प्लॉरेन्स नाईटिंगेल पुरस्कार दरवर्षी राज्यस्तर व परिमंडळ स्तरावर दिले जाण्याची प्रक्रिया नियमित सुरु आहे.

कालबध्द पदोन्नती देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी व उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ, जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

परिचारीकांना राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार विविध सर्व भत्ते दिले जात असून उपलब्धतेनुसार परिचारीकांना क्वॉर्टर्सचे वाटप केले जाते. आपत्कालीन परिस्थितीत परिचारीकांच्या येण्याजाण्याची तात्पुरती सोय केली जाते.

परिचारीकांना शुश्रुषा सेवेशी संबंधित कामे व सुट्टया देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**राज्यातील वाघांची संख्या १६९ वरुन १९० वर गेल्याचे राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाचे नुकत्याच प्रकाशित केलेल्या अहवालाबाबत**

**(५) १०६५९ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाघांची संख्या १६९ वरुन ती १९० वर गेल्याचे राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाचे नुकत्याच प्रकाशित केलेल्या अहवालावरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवेगांव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नेमकी वाघांची संख्या किती यावर वन वनविभागाचे अधिकारी आणि व्याघ्रप्रेमी संख्येत मतभेद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, वाघांच्या या संख्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून संपूर्ण राज्यातील व्याघ्र संख्येबाबतचा अहवाल प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अहवालात व्याघ्र प्रकल्पनिहाय वाघांच्या संख्येचा तपशिल देण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सन २०१४-१५ मध्ये कॅमेरा ट्रॅपव्दारे करण्यात आलेल्या प्रगणनेत नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात एकूण ७ प्रौढ वाघ असल्याचे आढळून आले आहे.

---

**पवई या संकुलातील जैवविविधतेच्या संवर्धनाकरीता मानव विकास मंत्रालयाने ग्रीन ऑफीस सुरु करण्याची योजना**

**(६) १२८२३ (०८-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवई या संकुलातील इंडियन इन्स्टिट्यट टेक्नॉलॉजी (आयआयटी) पवई या संकुलातील जैवविविधतेच्या संवर्धनाकरीता मानव विकास मंत्रालयाने सन २०१३ मध्ये ग्रीन ऑफिस सुरु करण्याची योजना आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीसाठी गत दोन वर्षात एकही बैठक झाली नाही याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, आयआयटीच्या ५६५ एकर जमिनीवर वनराईत सद्य:स्थिती कॉक्रीटच्या इमारतींचे संकुलन उभे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आयआयटी संकुलातील हिरव्या गर्द वनराईची जोपासना करण्यासाठी शासनस्तरावरील उपाययोजनात्मक कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०१६) :** (१) पवई इंडियन इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) संकुल हे राज्य शासनाच्या वन विभागाच्या अखत्यारीतील बाब नसून केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर अंतर्गत भंडारा-गोंदिया जिल्हयासोबतच नागपूर विभागातील अधिपरिचारिकांना नियमित सेवेत कार्यरत घेण्याबाबत**

**(७) १५७२९ (०९-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर अंतर्गत भंडारा-गोंदिया जिल्हयासोबतच नागपूर विभागातील कार्यरत बंधपत्रित शेकडो अधिपरिचारिका गेल्या १८ वर्षापासून अखंडीत शासकीय सेवेत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या परिपत्रकानुसार बंधपत्रित उमेदवारांना त्यांच्या ठराविक सेवेचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील इतर विभागात नियमित सेवेचे आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) परंतु नागपूर विभागातील सदर अधिपरिचारिकांनी १७ ते १८ वर्षे सेवा होऊनही त्यांना शासन परिपत्रकानुसार नियमित करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे का,
(४) असल्यास, संबंधित विभागाकडे दुर्लक्ष करित असल्याने सदर परिचारिकांचे भवितव्य अंधारात आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या सदर परिचारिकांना नियमित सेवेत समावून घेऊन व त्यांना अनेक वंचित ठेवण्यात आलेले लाभ मिळण्याबाबत शासनाकडून कोणती भूमिका घेण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) शासन अधिसूचना दिनांक १५/४/२०१५ अन्वये सेवा नियमित न झालेल्या बंधपत्रित अधिपरिचारीकांच्या सेवा नियमित होण्यासाठी शासन निश्चित करेल अशा प्राधिकृत संस्थेमार्फत आयोजित केलेली विशेष लेखी परिक्षा तीन संधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यानुसार विहित संधीत परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या परिचारिकांच्या सेवा नियमित करण्यात येतील.

---

**अहमदनगर जिल्हा रुग्णालयाच्या मनोरुग्ण विभागात रात्रपाळीच्या परिचारिकेवर रुग्णाच्या दोन नातेवाईकांकडून अतिप्रसंग करण्यात आल्याबाबत**

**(८) १८८५७ (१४-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात जिल्हा रुग्णालयाच्या मनोरुग्ण विभागात रात्रपाळीच्या परिचारिकेवर रुग्णाच्या दोन नातेवाईकांकडून अतिप्रसंग करण्यात आल्याची घटना माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवडयात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयात स्वतंत्र मनोरुग्ण विभाग नसून अशा स्वरुपाची घटना घडल्याचे आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हा शासकीय हिमोफिलीया या आजाराचे सुमारे ५२ रुग्ण उपचार घेत असल्याबाबत**

**(९) १९९१५ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात हिमोफेलिया या आजाराचे सुमारे ५२० रुग्ण उपचार घेत असल्याची माहिती दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजाराविषयी जनजागृती करण्यास शासकीय रुग्णालय अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हेमोफेलिया या आजाराविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०५-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे हिमोफिलीया आजाराचे ५४१ रुग्ण उपचार घेत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत दिनांक १४ मार्च, २०१३ रोजी सुरु करण्यात आलेल्या हिमॅटॉलॉजी कार्यक्रमाच्या माध्यमातून ठाणे, नाशिक सातारा व अमरावती येथील जिल्हा रुग्णालयात हिमोफिलीया व थॅलेसेमिया या आजारांचे निदान, उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात. या सर्व ठिकाणी Information, Education & Communication (IEC) साहित्य उपलब्ध करण्यात आले असून समुपदेशका मार्फत रुग्णाच्या नातेवाईकांचे समुपदेशन करण्यात येते. तसेच, व्याख्यान व मेळावे आयोजित करुन जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट रुग्णालयांनी रुग्णांकडून पॅकेजपेक्षा जादा पैसे घेतल्याबाबत**

**(१०) २३२०६ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ठ रुग्णालयांनी रुग्णांकडून पॅकेजपेक्षा जादा पैसे घेतल्याचे प्रकार कोल्हापूरसह विविध ठिकाणी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे जादा पैसे आकारले गेलेल्या कोल्हापूरातील ५३ रुग्णांना परतावा मिळवून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा जादा पैसे आकारणाऱ्या रुग्णालयांची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच अशा रुग्णालयांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०५-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयांची चौकशी करुन रुग्णांकडून अतिरिक्त घेतलेले पैसे परत करण्यात आले आहेत. तसेच टी.पी.ए कंपनीमार्फत तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयांना ताकीद, सुचना तसेच नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिकलसेलग्रस्त रुग्णांना औषधोपचाकरिता त्यांच्या निवासी गावापासून मोफत एस.टी.प्रवास सवलत देण्याबाबत

**(११) २४७२१ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिकलसेलग्रस्त रुग्णांना आवश्यक वैद्यकीय तपासणी व औषधोपचाराकरिता त्यांच्या निवासी गावापासून ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये प्रवास करण्यासाठी एका मदतनीसासह मोफत एस.टी.प्रवास सवलत देण्याबाबत दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या सुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर येथील परिवहन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे याबाबतचे पत्र प्राप्त झालेले नसल्याने या जिल्हयातील रुग्णांना या सवलतीचा लाभ अद्यापही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन आता कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०५-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सिकलसेलग्रस्त रुग्णास व त्याच्या सहाय्यकास सरकारी रुग्णालयात तपासणी व उपचारासाठी मोफत प्रवास सवलत देण्याबाबत दिनांक १० मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या योजनेकरीता दिनांक ११ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निधीचे वितरण करण्यात आले असून सदर निधी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## अहमदनगर जिल्हा रुग्णालयाच्या आवारात चारचाकी वाहनांच्या स्टॉलला परवानगी दिल्याबाबत

**(१२) ३०१५५ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील जिल्हा रुग्णालयाच्या आवारात चारचाकी वाहनांच्या प्रदर्शनाचा नियमबाह्य स्टॉल लावण्यात परवानगी दिल्याबद्दल रुग्णालयाच्या प्रशासन अधिकाऱ्याला जिल्हा शल्यचिकित्सक यांनी कारणे दाखवा नोटीस दिली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित प्रशासन अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०५-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित प्रशासन अधिकाऱ्यांची चौकशी करण्याबाबत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा हॉस्पीटलमध्ये मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यासाठी उभारलेल्या विभागांबाबत**

**(१३) ३०६८२ (२१-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा हॉस्पीटलमध्ये मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यासाठी उभारलेल्या ३५ विभागांमुळे आठ हजार बालकांना जीवदान मिळाले असून त्यात आणखी १२ विभाग नव्याने तयार करण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरहू बारा विभाग कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०५-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे राज्यामध्ये गंभीर आजारी नवजात बालकांवर उपचार करण्यासाठी २३ जिल्हा रुग्णालयात एकूण रुग्णालयात व ४ उपजिल्हा रुग्णालयात एकूण ३६ विशेष नवजात काळजी कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. या कक्षामध्ये सेप्सिस, न्युमोनिया, कमी वजनाच्या व अपुऱ्या दिवसांच्या बालकांवर तसेच श्वासावरोधाने व गंभीर जंतूसंसर्गाने ग्रस्त व इतर आजार असलेल्या नवजात शिशुंवर उपचार करुन काळजी घेतली जाते. १ एप्रिल ते ३१ जुलै, २०१५ या कालावधीत नवजात काळजी कक्षात एकूण १७०४३ बालकांना दाखल करण्यात येवून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. सदर ३६ विशेष नवजात काळजी कक्षापैकी १२ कक्षांचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे.
(२) १२ संस्थामधील कक्षाचे विस्तारीकरण करण्यासाठी निकषाप्रमाणे इमारत बांधकाम, आवश्यक यंत्र सामुग्री, वैद्यकीय उपकरणाची खरेदी व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील तब्बल १०२२ अंगणवाडयांना निधी मिळूनही स्वत:च्या इमारती नसल्याबाबत

**(१४) ३०९५५ (१२-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील तब्बल १०२२ अंगणवाडयांना निधी मिळूनही स्वत:च्या इमारती नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयतील अंगणवाडी केंद्र इमारती बाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| मंजूर अंगणवाडी केंद्र | स्वत:ची इमारत असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाडी केंद्राची संख्या |
|---|---|---|
| ३२६९ | २२५४ | १०१५ |

(२) स्वत:ची इमारत नसलेल्या १०१५ अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची इमारत बांधकामासाठी खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

| अ.क्र. | वर्ष | योजनेचे नाव | मंजूर करण्यात आलेला निधी |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | जिल्हा नियोजन समिती | १४.५० कोटी |
| २ | २०१५-१६ | जिल्हा नियोजन समिती | १५.०० कोटी |

सदर निधीमधून स्वत:च्या इमारती नसलेल्या ६१७ अंगणवाडी केंद्राच्या इमारती बांधकामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उर्वरीत ३९८ अंगणवाडी केंद्राच्या इमारतीसाठी पुढील आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाल विकास प्रकल्प अधिकारी कुर्ला या कार्यालयाला पूर्वीप्रमाणेच एल वॉर्ड (कुर्ला / पश्चिम) कार्यालयातील जागा मिळणेबाबत

**(१५) ३१४५४ (१२-०१-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाल विकास प्रकल्प अधिकारी, कुर्ला या कार्यालयाला पूर्वीप्रमाणेच एल वॉर्ड (कुर्ला/पश्चिम) कार्यालयातील जागा मिळणेबाबत या विषयावरील दिनांक १६ मे, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.महिला व बाल कल्याण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) होय.
(२) बाल विकास प्रकल्प अधिकारी, कुर्ला कार्यालयाच्या दि.१६.०५.२०१३, दि.२२.११.२०१३ व दि.११.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये जागा उपलब्ध करुन देण्याबाबत उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, कुर्ला (प), मुंबई यांना कळविण्यात आले आहे. तसेच भेटी व चर्चाव्दारे लवकरात लवकर एल वॉर्ड मधील जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती, त्यावर सद्यःस्थितीत एल विभाग कार्यालयाच्या इमारतीत जागा उपलब्ध करणे शक्य होत नाही, असे सहा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग, कुर्ला यांनी दिनांक १५.०६.२०१५ च्या पत्रान्वये प्रकल्प कार्यालयास कळविले आहे. मा.सदस्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने या विभागाच्या दि.२५.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना जागा उपलब्ध करुन देणे बाबत संबंधितांना सूचना देणे बाबत कळविण्यात आले आहे. सदर वस्तुस्थिती श्री.तुकाराम काते, विधानसभा सदस्य यांना या विभागाच्या दि.२३/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### १३ व्या वित्त आयोगांतर्गत अपूर्णावस्थेत असलेल्या अंगणवाडी इमारत

**(१६) ३२४५६ (१२-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) १३ व्या वित्त आयोगांतर्गत अंगणवाडी इमारत बांधकामासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी जिल्हा परिषद, लातूर यांना २७५.०० लक्ष निधी प्राप्त झाला होता, हे खरे आहे काय,
(२) सदरहू प्राप्त झालेल्या निधीतून जिल्हयात ६१ अंगणवाडी इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या होत्या व त्यापैकी ३३ अंगणवाडी इमारतींचे कामे पूर्ण झाली असून १४ कामे प्रगतीपथावर आहे व १४ कामे जागेअभावी रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मध्ये अखर्चित निधी ७४.०३ लक्ष शिल्लक होता अखर्चित रक्कमेस दिनांक ३१ मार्च, २०१५ अखेरपर्यंत खर्च करण्यास परवानगी मिळेल या धर्तीवर २०१४-२०१५ मध्ये ४१.५६ लक्ष खर्च करण्यात आले व उपरोक्त १४ प्रगतीपथावरील कामांना ३२.४७ लक्ष एवढा खर्च अपेक्षित असल्याने सदरहू खर्चास परवानगी द्यावी अशा मागणीचा एक प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी सचिव महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन यांचेकडे दिनांक २३ जून, २०१५ रोजी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर प्रस्तावानुसार शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.३३७/का.६, दिनांक ११ जानेवारी, २०१६ अन्वये अंगणवाडी इमारत बांधकामासाठी सन २०१०-११ तेसन २०१२-१३ (जिल्हा वार्षिक योजना आणि १३ वा वित्त आयोग) मध्ये प्राप्त झालेल्या निधीपैकी अखर्चित निधी सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्यास काही अटींसह मान्यता दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुपेवाडी (ता.बदनापूर, जि.जालना) येथील साठवण तलावाच्या कामाबाबत**

**(१७) ३३५८२ (२९-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्या तीन वर्षापासून तुपेवाडी (ता.बदनापूर, जि.जालना) येथील बंद असलेले साठवण तलावाचे काम सुरु करण्यात येऊन दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी माहे जुलै, २०१५ च्या सुमारास रस्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावेळी आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत त्या लेखी आश्वासनाची पूर्तता अद्यापही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने आता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१६) :** (१) होय.
(२) होय.

उप विभागीय अधिकारी, लघु सिंचन (जलसंधारण) सर्वेक्षण, उपविभाग, जालना यांनी तुपेवाडी साठवण तलावाचे अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करण्याबाबत लेखी आश्वासन दिले होते.
(३) व (४) सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावातील त्रुटांची पुर्तता करण्याबाबत अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांना विभागाचे दिनांक ५/३/२०१६ चे पत्रान्वये कळविले असून त्रुटी पुर्ततेची कार्यवाही मंडळस्तरावर सुरु आहे.

---

**मुखेड (ता.जि.नांदेड) शहराची लोकसंख्या २८ हजाराच्या आसपास असूनही या शहरात केवळ दोनच अंगणवाडया असल्याबाबत**

**(१८) ३३९९२ (१२-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (ता.जि.नांदेड) येथील मुखेड शहराची लोकसंख्या २८ हजाराच्या आसपास असूनही या शहरात केवळ दोनच अंगणवाडया असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शून्य ते तीन वर्षे वयोगटातील बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी एक हजार लोकसंख्या असलेल्या वस्ती एक अंगणवाडी केंद्र उभारण्याचे राज्य शासनाचे आदेश असून या संदर्भात सन २०१३ मध्ये १ ते ३ व ३ ते ६ वयोगटातील बालकांचा सर्व्हेही करण्यात आला त्यानुसार १७ पैकी १४ वार्डात अंगणवाडी स्थापन करणे गरजेचे होते परंतू तसे करण्यात आले नसल्याने या वयोगटातील बालकांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) होय.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्र कार्यान्वित करुन योजनेचा लाभ गरोदर माता, स्तनदा माता, ० ते ६ वयोगटातील बालकांना दिला जातो. मुखेड शहराला सध्या दोन अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. तथापि, अतिरिक्त १६ अंगणवाडी केंद्र मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव केंद्रशासनास सादर करण्याची कार्यवाही चालू आहे. केंद्र शासनाने वाढीव अंगणवाडी केंद्रांना मंजूरी दिल्यानंतर मुखेड शहरात अतिरिक्त अंगणवाड्या सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आधुनिकीकरण आणि विकास करण्याच्या नावाखाली खासगी कंपन्यांशी करार करून अंगणवाडयांचे खासगीकरण करण्याचा प्रस्ताव**

**(१९) ३४६१३ (१२-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आधुनिकीकरण आणि विकास करण्याच्या नावाखाली खासगी कंपन्यांशी करार करून अंगणवाडयांचे खाजगीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास तीव्र विरोध करण्यासाठी व अंगणवाडयाचे खाजगीकरण थांबवा, केंद्राकडून मिळणारे मानधन व भाऊबीज तात्काळ दया, या मागणीसाठी सिंधुदुर्ग जिल्हयातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी

अधिकारी यांच्या कार्यालयावर नुकताच माहे ३० सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अंगणवाडी कर्मचारी सभा (महाराष्ट्र) या संघटनेने दिनांक २९/९/२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग जिल्हा येथे मोर्चा काढला होता, हे खरे आहे.
(३) व (४) अंगणवाड्यांचे खाजगीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही. सद्य:स्थितीत राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना माहे ऑक्टोंबर, २०१५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षाची रु. १०००/-प्रमाणे भाऊबीज भेट देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार भाऊबीज भेट अदा करण्यात आली आहे. सन २०१४-१५ या वर्षातील दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंतचे वाढीव मानधन अदा करण्यासाठी हिवाळी अधिवेशन २०१५ मध्ये पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली आहे.

---

**सिंधुदुर्गात वृक्षतोड बंदी लागू झाल्यानंतरही उपवनसंरक्षक आणि तहसिलदार पातळीवरून दिलेल्या परवानगीने लाखो वृक्षांची तोड झाल्याबाबत**

**(२०) ३४६२२ (१३-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्गात वृक्षतोड बंदी लागू झाल्यानंतरच्या काळात उपवनसंरक्षक आणि तहसिलदार पातळीवरून दिलेल्या परवानगीने लाखो वृक्षांची तोड झाल्याचे माहितीच्या अधिकारात मागविलेल्या माहितीतून निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी माहे डिसेंबर, २०१४ च्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या अतांराकित प्रश्नाला उत्तर देतांना सिंधुदुर्गात वृक्षतोड झाल्याचे मान्य करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, वृक्षतोड झाल्याचे आढळून आले असतांनाही अदयापी दोषीवर कारवाई झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नियमांचे उल्लघंन करून परवानगी देणाऱ्या दोषी व्यक्तींवर शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली तसेच वृक्षतोडीस परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निलंबनाबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयात मा.उच्च न्यायालयाने फक्त २५ गावांमध्ये वृक्षतोड बंदीचे आदेश दिले आहेत. त्यानंतर त्या गावांमध्ये उपवनसरंक्षक यांचे पातळीवर वृक्षतोड परवानगी दिलेली नाही. परंतु सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील खाजगी व मालकी क्षेत्रामध्ये विनापरवाना अवैध वृक्षतोड झाल्याबाबत निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

खाजगी क्षेत्रात विना परवाना वृक्षतोड केल्याप्रकरणी वनविभागाचे वृक्ष अधिकारी यांनी महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम-१९६४ चे कलम ३ व ४ अन्वये कार्यवाही करुन अवैध माल जप्त करुन दंड वसूल केलेले आहे.

(४) वनविभागाने अधिका-यांनी कोणतेही नियमांचे उल्लघंन केलेले नाही. फक्त विनापरवाना वृक्षतोड काही प्रकरणात अल्पशः माल सरकारजमा केलेला आहे व जास्तीचा माल खुला केल्याबाबत दि.४.२.२०१५ अन्वये श्री.स.प.कदम, श्री.अ.ब.जेरे, श्री.बा.श्री.शिंदे व श्री.सं.भा.पाटील, वनक्षेत्रात यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील दाजीपुर अभय अभयारण्याच्या परिसराच्या विकासासाठी पर्यटक विकास आराखडा वन विभागाकडे सादर केल्याबाबत**

**(२१) ३५३६० (१३-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गवा रेड्यासाठी प्रसिद्ध असणारे दाजीपुर अभयारण्याच्या परिसराच्या विकासासाठी ३० कोटी रुपयांचा पर्यटक विकास आराखडा वन विभागाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दाजीपुर अभयारण्याचा पर्यटन विकास आराखड्यासाठी तात्काळ निधीची उपलब्धता करून या परिसरातील पर्यटन विकासाला चालना देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या ५ वर्षाच्या कालावधीसाठी राधानगरी अभयारण्याकरिता पर्यटन विकास कामातंर्गत रु.३०.०० कोटीचा आराखडा करण्यात आला आहे.

(२) राधानगरी अभयारण्याकरिता तयार करण्यात आलेल्या आराखड्यात सन २०१५-१६ साठी रु. ११२५.०० लक्षची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी राज्य योजनांतर्गत २४०६ २२९५ या लेखाशिर्षातंर्गत रु. ३४.७० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील अनेक अंगणवाडया भाडयाच्या इमारतीत असल्याबाबत**

**(२२) ३६२४७ (१२-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील येणाऱ्या गावखेडयामध्ये भरणाऱ्या अंगणवाड्या भाडयाच्या इमारतीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय

(२) सदर अंगणवाडयामध्ये शौचालय, पिण्यासाठी शुध्द पाणी, खेळण्यासाठी क्रिडांगण, आदि. मुलभुत सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय

(३) असल्यास, तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी कारभार सांभाळण्याकरीता बालविकास प्रकल्प अधिकारी, वरिष्ठ लिपीक, अंगणवाडी सेविका, मदतनीस एकूण ७ पदे रिक्त आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संबंधाने प्रशानाने सदर तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात पदे भरण्यास मंजुरी दिली आहे कास,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प काटोल अंतर्गत १६ अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीत भरत आहेत. सदर अंगणवाडी इमारतीचे बांधकाम विविध योजनेतून सन २०११-१२ ते २०१३-१४ मध्ये मंजूर झालेले होते. परंतु काही अंगणवाडी इमारतीस जागा उपलब्ध न झाल्याने तथा बांधकामाची तरतूद अपुरी असल्याने व काही ठिकाणी निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने सदर ठिकाणी अंगणवाडीचे बांधकाम होऊ शकले नाही.

(२) सदर अंगणवाड्यांमध्ये शौचालय, खेळण्यासाठी क्रिडांगण उपलब्ध नाही. मात्र शुध्द पिण्याचे पाण्याची सोय उपलब्ध आहे.

(३) होय. खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत.

बाल विकास प्रकल्प अधिकारी - १ पद

मिनी अंगणवाडी सेविका - २ पदे

अंगणवाडी मदतनीस - ४ पदे

(४) प्रकल्पस्तरावरुन मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच बाल विकास प्रकल्प अधिका-याचे पद भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आसोला (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील साठवण तलावाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२३) ३८१३२ (१२-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आसोला (ता. रिसोड, जि. वाशिम) येथील अनेक वर्षापासून रखडलेल्या साठवण तलावाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने येथील दुष्काळाने निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता साठवण तलावाचे काम त्वरीत सुरु करणेबाबत मा. जलसंपदा मंत्री यांना येथील गावकऱ्यांनी निवेदन दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त साठवण तलावाचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१६) :** (१) होय,

मौजे आसोला साठवण तलाव ता.रिसोड, जि.वाशिम या तलावांचे काम अनेक वर्षापासून सुरु होऊ शकले नाही कारण सदर योजनेचे भूसंपादन संयुक्त मोजणीस संबंधित कास्तकारानी तिव्र विरोध केला आहे. जलसंधारण मंत्री यांना दिनांक २७/३/२०१५ रोजी गावकऱ्यांनी निवेदन दिले आहे.

(२) संबंधित कास्तकारांची समजुत घालण्याचे प्रयत्न करण्यात आले परंतु संबंधित कास्तकारांची मानसिकता नकारात्मक असल्याने सदर मोजणीचे प्रस्ताव लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, वाशिम यांचेकडून जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले असून जिल्हाधिकारी यांनी दिनांक १९/१/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी यांना सदर प्रकरण पाठविले असून मोजणी प्रकरणाचे काम प्रगतिपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बालगृहांना देण्यात येणा-या दर्जाबाबत**

**(२४) ४००१८ (३०-०४-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे एक हजार बालगृहे असून त्यापैकी निम्म्या (सुमारे पाचशे) बालगृहांमध्ये शासनाकडून अनुदान मिळूनही पुरेशा सोईसुविधा नसल्याचे बालगृहांच्या तपासणीतून निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपु-या सुविधा देणा-या बालगृहांची रवानगी ब आणि क वर्गामध्ये झाली असून त्यांना शासनाकडून अनुदान नाकारण्याची कारवाई केली जाणार असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती बालगृहांना अ दर्जा मिळालेला आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०६-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

शासन निर्णय क्र.बालगृ-२०१५/प्र.क्र.५०/का-८, मुंबई दिनांक १३ जुलै, २०१५ अन्वये राज्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत कार्यरत बालगृहांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत (महसूल विभाग) तपासणी करण्यात येऊन बालगृहांच्या दर्जाबाबत वर्गवारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने राज्यातील तपासणी करण्यात आलेल्या ९६३ बालगृहांपैकी 'अ' श्रेणी मध्ये ४६६, 'ब' श्रेणीमध्ये २७३ तर २१४ बालगृहे क आणि क पेक्षा कमी दर्जामध्ये आढळून आलेली आहेत.

(२) सदर तपासणीविरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल असून, शासनाने क व क व्यतिरिक्त वर्गवारीतील सर्व बालगृहांची मान्यता रद्द करण्याबाबत, ब श्रेणीमध्ये आलेल्या बालगृहाना त्यांचे अनुदान थांबवून त्यांना अ श्रेणीमध्ये येण्यासाठी सुधारणा करण्याच्या अनुशंगाने ६ महिन्याचा अवधी देण्यात यावा, अ श्रेणीमध्ये असणा-या बालगृहांना पूर्ण अनुदान देण्यात यावे, असे मा.न्यायालयास प्रस्तावित केले आहे. मात्र, याबाबत मा.न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार निर्णय अपेक्षित आहे.

(३) सदर तपासणी अंती आतापर्यंत एकूण ४७६ बालगृहांना अ दर्जा प्राप्त झालेला आहे.

---

**मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन महानगरात सरकारी व निमसरकारी तसेच खाजगी क्षेत्रात नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सर्व सोयी सुविधांसह मोफत वसतीगृह सुरु करण्याबाबत**

**(२५) ४०६२७ (३०-०४-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन महानगरात सरकारी व निमसरकारी तसेच खाजगी क्षेत्रात नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सर्व सोयी सुविधांसह मोफत वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतीगृहात महिलांसाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत व ही वसतीगृहे महानगरात कोणत्या भागात बांधण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, सदर वसतीगृहे बांधण्यासाठी किती कालावधीचे नियोजन करण्यात आले आहे वा त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही. तथापि, केंद्र शासन पुरस्कृत नोकरी करणाऱ्या महिलांच्या वसतिगृह योजनेअंतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत नोकरी करणाऱ्या महिलांची वसतिगृहे केंद्र शासनाच्या निकषानुसार कार्यरत आहेत. यामध्ये मुंबई शहर व मुंबई

व उपनगर या दोन्ही जिल्ह्यामध्ये एकूण १४ वसतिगृहांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी १० वसतिगृहे कार्यरत असून या वसतिगृहांची १४५८ प्रवेशित मंजूर संख्या आहे. तसेच पुणे जिल्ह्यात ९ व नागपूर जिल्ह्यामध्ये १० इतक्या वसतिगृहांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून त्यांची मंजूर संख्या अनुक्रमे ७७४ व ९६२ इतकी आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमधील गावांचे स्थलांतराची प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय**

**(२६) ४०७१८ (०७-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमधील कुसापूर रवदी, आडोशी, माडोशी तांबी, खिरखिंडी आणि वासोटा या ७ गावांचे पुनर्वसन भिवंडी (जि.ठाणे) जवळील एकासाल आणि सागाव या गावांच्या जवळ होत असून स्थलांतरांची प्रक्रिया सुरू झाली असून माहे मार्च २०१६ अखेर पूर्ण करण्याचा वन खात्यांने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) पुनर्वसनासाठीच्या जमिनीवर 'नवीन शर्त' हा शिक्का असलेली जमिन परवानगी शिवाय विकता येत नाही तसेच सहयाद्रीतील सदरहू ७ गावाच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू होवूनही हा शिक्का पुनर्वसनातील जमीनीवर अद्याप पडलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) सहयाद्रीमधील विस्तापीतांची प्रक्रिया तांत्रिक अडचणीत सापडली असून पुनर्वसनाच्या जमिनीवर बिल्डरांचा डोळा असल्याने प्रकल्पग्रस्तांची या विकासकांकडून कोणत्याही प्रकारे फसवणूक वा दबाब येवू नये व पुनर्वसन साठीच्या जमिनीवर 'नवीन शहर' हा शिक्का विनाविलंब उमटविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सद्यःस्थितीत पुनर्वसनाची कार्यवाही सुरु आहे. पुनर्वसनाची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर ७/१२ सदरी "नवीन शर्त" बाबत आवश्यक त्या नोंदी घेण्यात येतील.
(३) व (४) पुनर्वसित कुटुंबांसाठी गावठाणा निश्चित करण्यात येत असून "नवीन शहर" हा शिक्का उमटविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर विभागातील उद्यान वनखात्यामुळे विकसित करण्यास अडचणी निर्माण होत असल्याबाबत**

**(२७) ४११५१ (०७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर विभागामध्ये असणारे घोडबंदर उद्यानाचे भूमिपूजन १५ वर्षांपूर्वी करूनही वनखात्यामुळे उद्यान विकसित करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, यामुळे सदर उद्यान पडीक असून त्याचा नागरिकांना कोणत्याही प्रकारे लाभ घेत येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्यानात सुशोभिकरणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
मौजे कोलशेत येथील उद्यानाकरीता आवश्यक असलेली जमीन विकसीत करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेकडे लिजने किंवा कायमस्वरुपी वर्ग करणे आवश्यक आहे. त्याशिवाय महानगरपालिकेच्या कायद्यानुसार त्यासाठी निधी खर्च करता येणे शक्य नसल्याबाबत आयुक्त महानगर पालिका, ठाणे यांनी कळविले आहे. वनसंवर्धन अधिनियम, १९८० मधील तरतुदींनुसार सदर जमीन केंद्र शासनाचे पूर्व परवानगीशिवाय ठाणे महानगरपालिकेला हस्तांतरीत करता येणार नाही, अशा दोन कायद्यांच्या अडचणीमुळे सदर उद्यान तयार करणे शक्य होणार नसल्याचे दिनांक २३.०९.१९९७ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यामुळे उद्यानाचे काम झाले नाही.
(२) सदर क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या राखीव वनक्षेत्रापैकी आहे. सदर ठिकाणी कोणतेही उद्यान नसल्याने नागरीकांना सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारे लाभ घेता येत नाही हे मात्र खरे आहे.
(३) प्रस्तुत जागेची पहाणी वास्तुविशारदमार्फत करुन वनअधिनिमांचा कोणताही भंग न करणारी कामे समाविष्ट असणारा प्रस्ताव वनविभागाकडे सादर करावा, तदनंतर सदर प्रस्तावाची वनविभागाने तपासणी करुन त्यामध्ये वन अधिनियमांचा भंग होणार नाही यांची खात्री करुन महानगरपालिकेने त्यास परवानगी द्यावी असे दि. १८.०५.२०१६ रोजीच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), आयुक्त ठाणे महानगरपालिका ह्यांच्या बैठकीत ठरले आहे. त्यानुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करयात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळमनूरी (जि.हिंगोली) तालुक्यातील रुद्रवाडी शिवारात विविध वन्य प्राण्यांचा हैदोस वाढल्यामुळे पिकांची मोठया प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(२८) ४१३३१ (०७-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी (जि.हिंगोली) तालुक्यातील रुद्रवाडी शिवारात विविध वन्य प्राण्यांचा हैदोस वाढल्यामुळे पिकांची मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन प्राण्यांचा उपद्रव थांबविण्यासाठी कोणती तातडीची कारवाई वन विभागाने केली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कारवाई केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही, कळमनुरी (जि.हिंगोली) तालुकयातील रुद्रवाडी शिवारात विविध वन्यप्राण्यांमुळे नुकसान केल्याबाबत कोणताही अर्ज विभागीय वन अधिकारी, हिंगोली यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला झालेल्या महिला तसेच बालिकांच्या पुनर्वसनासाठी अनुदान उपलब्ध न झाल्याबाबत**

**(२९) ४१६७९ (३०-०४-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला झालेल्या महिला तसेच बालिकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने सुरु केलेल्या मनोधैर्य योजनेअंतर्गत माहे डिसेंबर २०१५ अखेर महिला व बालकल्याण विभागाकडे दाखल झालेल्या व मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे पिडितांना अथवा त्यांच्या वारसदारांना अर्थसहाय्य मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय चौकशीत काय आढळून आलेले आहे,

(३) उपरोक्त योजनेअंतर्गत संबंधितांना अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०६-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) मनोधैर्य योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यामध्ये बलात्कार/बालकांवरील लैंगिक आणि ॲसिड हल्लामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांच्या पुनर्वसनासाठी माहे डिसेंबर, २०१५ अखेर एकूण १४१ प्रकरणे मंजूर झालेली आहेत. त्यापैकी १०५ प्रकरणामध्ये अनुदान अदा करण्यात आला आहे. उर्वरित ३६ लाभार्थ्यांसाठी रु.८४ लाख अनुदानाची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार मार्च, २०१६ अखेरीस शासनाकडून पुरवणी

मागणीन्वये एकंदरीत रु.२१८८.८५ लाख इतका निधी सर्व जिल्ह्यांना वाटप करण्यात आला असून, त्यामधून प्रलंबित प्रकरणांमध्ये लाभ देण्यात आले आहे.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यात चिपळूण-कराड रस्त्यावर कुंभार्ली घाटात बिबट्याचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३०) ४२०५१ (०७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यात (जि.रत्नागिरी) चिपळूण-कराड रस्त्यावर कुंभार्ली घाटात रात्री अज्ञात वाहनांच्या धडकेने जखमी झालेल्या बिबटयाचा मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी करुन या बिबटयाला धडक देणाऱ्या वाहनाचा शोध घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०६-२०१६) :** (१) व (२) चिपळूण कराड रस्त्यावर दिनांक ०६.०१.२०१६ रोजी रात्री बिबट मादी पिल्लू (अंदाजे वय ५ माहिने) अज्ञात वाहनाच्या धडकेने जखमी झाल्याचे आढळून आले असता तात्काळ पशुधान विकास अधिकारी, चिपळूण यांचेकडे प्राथमिक उपचाराकरीता नेण्यात आले. तथापि, सदर बिबट मादी पिल्लू दिनांक ०७.०१.२०१६ रोजी सकाळी ६.०० वाजता गंभीर दुखापतीमुळे मृत पावले आहे.

सदर प्रकरणी आरोपीचा व अज्ञात वाहनाचा शोध घेण्यात आला असता अज्ञात वाहन आरोपी मिळून आलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोअर व बफरच्या १७०० चौ.कि.मी जंगलात ८८ पट्टेवार वाघांची नोंद घेण्यात आल्याबाबत**

**(३१) ४२०७९ (०७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोअर व बफरच्या १७०० चौ.कि.मी जंगलात ८८ पट्टेवार वाघांची नोंद घेण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वाघांची संख्या सुखावह असली तरी या वाघांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) ताडोबा-अंधारी व्याघ्रपकल्पाचे कोअर व बफर क्षेत्र मिळून १७२१.७१ चौ. कि.मी. क्षेत्र आहे. उक्त क्षेत्रापैकी १३२०.२१ चौ. कि.मी. वनक्षेत्र आहे. त्यापैकी १३१० चौ. कि.मी. क्षेत्रात सन २०१५ मध्ये भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादून यांचे मार्फत कॅमेरा ट्रॅपिंगमध्ये एकूण ७१ वाघ आढळून आले तसेच वैज्ञानिक पध्दतीप्रमाणे वाघांची अंदाजीत संख्या (घनतेनुसार) ८८ इतकी आहे.

(२) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खालीप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- सन २०१२ पासून विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली आहे.
- प्रकल्पाच्या कोअर व बफर क्षेत्रात एकूण ४९ संरक्षण कुट्या उभारण्यात आलेल्या आहेत.
- बिनतारी संदेश यंत्रणा २४ तास कार्यरत करण्यात आलेली आहे.
- वाघांसह इतर वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या सोईकरीता वनक्षेत्रात वनतलाव, खोदतळे, कृत्रिम पाणवठे, सोलर पंप व बोरवेल तयार करण्यात आलेल्या आहेत.
- व्याघ्र संवर्धनात स्थानिकांचे सहकार्य मिळविण्याच्या दृष्टीने श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन योजना प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावांमध्ये राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने पिडीत महिला व बालकांना पुनर्वसनासाठी ट्रामा टीमच्या नियुक्तीसंदर्भात**

**(३२) ४२४६५ (३०-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अत्याचार झालेल्या पिडीत महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी पुनर्वसनासाठी योजनेत्तर तीन लाख रुपयांच्या मदतीची तरतुदीची योजना सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पीडीतांच्या पुनर्वसनासाठी ट्रामा टीमची नियुक्ती केली नसल्याने पीडितांपर्यत मदत पोचत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मनोधैर्य योजनेतील ट्रॉमा टीमच्या नियुक्तीसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापि, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०६-२०१६) :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २१.१०.२०१३ नुसार राज्यात बलात्कार/बालकांवरील लैगिंक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना रु.२ लाख व रु.३ लाख अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी दिनांक ०२.१०.२०१३ पासून घडलेल्या घटनांसाठी मनोधैर्य ही योजना अंमलात आणली आहे.

(२) नाही. दिनांक २६.०८.२०१४ अन्वये मनोधैर्य योजनेसाठी District Trauma Team गठीत करण्यात आली आहे.

(३) बलात्कार/बालकांवरील लँगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये सापडलेल्या महिला आणि बालकांना तातडीने मानसिक आधार मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित District Trauma Team नियुक्त करण्यात येईल. District Trauma Team मध्ये प्रामुख्याने महिला समुपदेशक, वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक व्यक्ती व पोलीस अधिकारी यांचा समोवश असेल व त्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल. या टिममध्ये पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा व तालुका स्तरावरील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, मानसोपचार तज्ञ आणि नर्स, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अखत्यारितील सर्व संरक्षण अधिकारी, बाल परिविक्षा अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

सदर District Trauma Team चे कामकाज पुढीलप्रमाणे चालणार आहे. बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार इ.घटनानंतर संबंधित महिला व बालक यथास्थिती त्यांचे कुटुंबिक जे जाबजबाब देण्याच्या मनस्थितीत नसतात. सदर घटना घडल्यानंतर त्यांना त्या आघातातून बाहेर काढण्यासाठी त्यांचे जाबजबाब केव्हा व कसे नोंदविणे, त्यासंदर्भात आवश्यक तो तपास करणे, त्यांची वैद्यकीय तपासणी करणे, त्याचप्रमाणे सदर घटनेबाबत आवश्यक परिस्थितीजन्य पुरावा तसेच ज्यांना शेवटपर्यत सहाय्य करणे.

District Trauma Team गठीत करणेबाबत शासन निर्णय दिनांक २६.०८.२०१४ च्या शासन निर्णयानुसार सुरुवातीला ट्रामा टीमच्या सदस्यांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. District Trauma Team मधील सदस्यांना प्रशिक्षणासाठी साधन व्यक्तींना प्रशिक्षित करण्यासाठी राज्यस्तरावर TOT आयोजित करण्यात येत आहे. त्यांच्या प्रशिक्षणासाठी मोड्यूल तयार झालेले आहे. TOT चे प्रशिक्षण पूर्ण होताच शासनास्तरावरुन निधी उपलब्ध झाल्यावर विभागीय/जिल्हास्तरावर ट्रामा टीमचे सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचा कालबध्द कार्यक्रम ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड व सिन्नर तालुकयात (जि.नाशिक) बिबटयांसाठी पिंजरे लावण्याची मागणी**

**(३३) ४३६८४ (०७-०५-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड व सिन्नर तालुक्यात (जि.नाशिक) बिबटयाचा असलेल्या ठिकाणी पिंजरा लावण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये करुनही अद्यापपर्यंत पिंजरे पुरविण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बिबटयापासून नागरीकांचे संरक्षण व्हावे म्हणून सदर बिबटयांना पकडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) ह्या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

- बिबट प्रवण क्षेत्रात मानव बिबट संघर्ष निर्माण होवू नये व नागरीकांचे बिबट्यापासून संरक्षण व्हावे म्हणून आवश्यकतेनुसार बिबट प्रवण क्षेत्रात पिंजरे लावण्यात येतात.
- बिबटप्रवण क्षेत्रातील नागरीकांचे मानव-बिबट संघर्ष टाळण्यासाठी प्रबोधन करण्यात येते.
- बिबटप्रवण क्षेत्रातील नागरीकांना खबरदारी घेण्याबाबत सतर्क करण्यात येते.
- बिबटप्रवण क्षेत्रात वनअधिकारी/कर्मचा-यांची गस्त वाढवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पश्चिम उपनगरातील २२० खाजगी जमिनीवर असलेल्या ६९ हजर झोपड्या सन २००० मध्ये बुलडोझर फिरवून उद्ध्वस्त केल्याबाबत

**(३४) ४४३२१ (०७-०५-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यावरणचे कारण सांगून शासनाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पश्चिम उपनगरातील २२० खाजगी जमिनीवर असलेल्या ६९ हजार झोपड्या सन २००० मध्ये बुलडोझर फिरवून उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ बिल्डरांच्या हितासाठी वन विभागाने हे कारवाईचे षडयंत्र रचल्याचा आरोप करत घर हक्क जागृती परिषदेने गोरगरीबांच्या घरांसाठी १५ वर्षापासून संघर्ष सुरु ठेवला असून ही २१ हजार कुटुंबे आजही पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानतरही राष्ट्रीय उद्यानातील जमिनीची हद्द निश्चित करण्याबाबत शासनाने आजमितीस कोणताही ठोस निर्णय घेतला नसल्यामुळे ६ वर्षापासून जमिनीचे सर्व्हेक्षण रखडल्याने सदरहू २१ हजार गोरगरीबांचे संसार वाऱ्यावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) सरकारी गॅझेट, नोटिफिकेशन, भारतीय वन अधिनियम, १९२७ संपादनाची नोटिस बोरीवली तहसिलदारांचा अहवाल व जिल्हाधिकारी कार्यालयातील नोंदीवरुन ही जमीन खाजगी असल्याचे उघड झाले असले तरीही सन २००९ मध्ये राष्ट्रीय उद्यान व भोवतालच्या परिसराची विशेष बाब म्हणून नोंदणी करण्याचे आदेश सर्वाच्च न्यायालयाने दिल्यानंतरही वन विभागाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील खाजगी जमिनीवर उभ्या राहिलेल्या

झोपड्यावर बुलडोझर फिरविल्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची तसेच संबंधित दोषीविरोधात त्वरीत ठोस कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच घरहक्क परिषदेच्या अध्यक्ष यांनी माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरेआहे काय,

(५) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) व (२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची वनजमीन अतिक्रमाणमुक्त करण्याद्दष्टीने मा.उच्च न्यायालयांत दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत असलेल्या वनजमिनीवरील २२००० अतिक्रमित झोपड्यांचे सन २००० मध्ये निष्कासन करण्यात आले होते. तत्पूर्वी जे अतिक्रमक १.१.१९९५ पूर्वीपासून वनजमिनीवर रहात होते/ आहेत व ज्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रक्कम व रु.७०००/- भरलेल्या एकूण २५१४४ अतिक्रमकांपैकी ११०३० अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर मौजे चांदिवली पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरित १४११४ अतिक्रमकांचे पुनर्वसन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मौजे चांदिवली येथे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) मा. उच्च न्यायालयाच्या दि.१५/९/२००३ च्या ओदशाविरुध्द अतिक्रमकांच्यावतीने तसेच लोकप्रतिनिधींच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयांत सिव्हील अपील दाखल झाले होते. त्यासोबत शासनाच्यावतीने I.A. No.१/२००४ मा.सर्वोच्च न्यायालयांत दाखल करण्यात आला होता. सदर सर्व दाव्यांमध्ये हद्दीची पुनर्मोजणी करावी, अशी विनंती होती. पंरतु सदरचे सर्व अपील व शासनाने दाखल केलेला I.A. दि.८/५/२००९ च्या आदेशात अनधिकृत वास्तव्याबाबत रिट याचिकेद्वारे निर्णय देणे विधीवत नसल्याने याबाबत सक्षम प्राधिकरणाने निर्णय घ्यावा, असे नमूद करुन सिव्हील अपील फेटाळण्यात आले आहे.

(४) वनविभागाने खाजगी जमिनीवर उभ्या राहिलेल्या झोपड्यांवर बुलडोझर फिरविल्यामुळे या प्रकरणी चौकशी करण्याची व संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच घरहक्क जागृती परिषदेच्या अध्यक्ष यांनी डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे हे खरे आहे.

सरकारी गॅझेट, नोटीफिकेशन, भारतीय वन अधिनियम १९२७, संपादनाची नोटिस व संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे अभिलेखानुसार सदर क्षेत्र खाजगी नसून सदर क्षेत्राचा दर्जा हा राखीव वन आहे.

अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही ही रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील वनजमिनीवरील अतिक्रमित झोपड्यांच्या संदर्भात दिलेल्या आदेशान्वये करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील काटोल रोडवरील मुलींचे तसेच पाटणकर चौक येथे शासकीय मुलांचे निरीक्षण, गृह कनिष्ठ बालगृह व वरिष्ठ बालगृहातील मुलांना देण्यात येणारे भोजन, दूध व फळे देणे व बंद करण्यात आल्याबाबत**

**(३५) ४४४१२ (३०-०४-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील काटोल रोडवरील मुलींचे तसेच पाटणकर चौक येथे शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, कनिष्ठ बालगृह व वरिष्ठ बालगृह असून या बालगृहातील २०० मुलांना देण्यात येणारे भोजन, दूध व फळे देणे बंद करण्यात आले असल्याची बाब डिसेंबर, २०१५ च्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चार निरीक्षणगृहांना शासनाच्या महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत कंत्राटदार नेमण्यात आले असून, या कंत्राटदारांची चार वर्षापासूनची बिले शासनाकडून थकीत असून सुमारे ६० ते ७० लाखांची बिले शासनाने अदा न केल्याने कंत्राटदारांनी माहे १० डिसेंबर पासून बालगृहातील मुलांना भोजन पुरवठा बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारच्या एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या माध्यमातून या वसतीगृहांना निधीचा पुरवठा होत असतानाही अन्नधान्य पुरविणा-या कंत्राटदारांची बिले थकण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या चारही निरीक्षण गृहातील २०० हून जास्त मुले उपाशी राहण्यास जबाबदार असलेल्या महिला व बालविकास विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०६-२०१६) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

दिनांक १०/१२/२०१५ ते दि.१४/१२/२०१५ या कालावधीमध्ये पुरवठाधारकांकडून अन्नधान्य पुरवठा बंद करण्यात आलेला होता. तथापि, दि.१५/१२/२०१५ पासून सदर पुरवठा पूर्ववत चालू करण्यात आलेला आहे.

(३) एकात्मिक बाल संरक्षण योजनेकडून निकषाप्रमाणे म्हणजे रु.७५०/- प्रति बालक याप्रमाणे तरतूद वितरीत करण्यात येते मात्र शासकीय संस्थांचा वेतनेत्तर बाबीवरील खर्च त्यापेक्षा अधिक होत असल्यामुळे कंत्राटदारांची देयके थकित राहिलेली होती. नागपूर जिल्ह्यातील कंत्राटदारांना रु.८.८४ लक्ष इतके तरतूद तात्काळ उपलब्ध करुन दिलेली होती आणि शासन निर्णय दि.०८.०१.२०१६ अन्वये रु.३१.८० लक्ष एवढा निधी पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करण्यात येऊन एकूण रु.४०.६४ लक्ष इतकी रक्कम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नागपूर यांना उपलब्ध करुन दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

संस्थेमध्ये १ महिना पुरेल एवढा अन्नधान्य साठा उपलब्ध असतो व त्यातूनच मुलांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आल्यामुळे सदर निरीक्षणगृहातील मुल उपाशी राहिलेली नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांना प्रतिदिन १३० व ६० रुपयांचा बदल्यात दिवसभर राबावे लागते व अनेक अशैक्षीणक कामे करावी लागत असल्याबाबत**

**(३६) ४५८५० (३०-०४-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांना प्रतिदिन १३० व ६० रुपयांचा बदल्यात दिवसभर राबावे लागते व अनेक अशैक्षीणक कामे करावी लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडे अशैक्षणिक कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अंगणवाडी कर्मचा-यांना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेव्यतिरिक्त कोणतीही कामे परस्पर सोपवू नयेत असे आदेश महिला व बाल विकास विभाग, परिपत्रक क्र.एबावि-२०११/प्र.क्र.१३/का.०६, दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ अन्वये देण्यात आलेले आहेत, त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील महिला व बालकल्याण विभागामार्फत मागील वर्षी सुमारे ३९९ जोडप्यांचे विवाह पार पडले असून शासनाचे अनुदानाचा लाभ मात्र अद्यापि त्यांना देण्यात आला नसल्याबाबत**

**(३७) ४६९२१ (३०-०४-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील महिला व बालकल्याण विभागामार्फत मागील वर्षी सुमारे ३९९ जोडप्यांचे विवाह पार पडले असून शासनाचे अनुदानाचा लाभ मात्र अद्यापि त्यांना देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर योजनेमध्ये काही सामाजिक संस्थांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय तसेच चौकशी मध्ये काय आढळून आले,
(४) असल्यास, शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे तसेच लाभार्थी जोडप्यांना शासन कधी अनुदान उपलब्ध करुन देणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ करीता ३९९ जोडप्यांना अदा करावयाच्या रक्कमेचे देयक जिल्हा कोषागारापातून पारीत झाले असून २९४ लाभार्थ्यांचे अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकाराची तक्रार जिल्हा कार्यालयास प्राप्त नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३८) ४८१०२ (३०-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३८ मधील प्रश्न क्रमांक ८४७७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांचे मानधन कमी असल्याने त्यांच्या मानधनात कुटुंबाची उपजिविका होत नसल्याने त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१४/प्र.क्र.२७/का.६, दिनांक ३० एप्रिल, २०१४ नुसार अंगणवाडी सेविका रु.९५०/-, मदतनीस रु.५००/- व मिनी अंगणवाडी सेविका रु.५५०/- एवढी राज्यशासनामार्फत देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सदर कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे मानधन अदा करण्यात येत आहे.

अ) अंगणवाडी सेविका रु. ५,०००/- दरमहा
ब) अंगणवाडी मदतनीस रु. २५००/- दरमहा
क) मिनी अंगणवाडी सेविका रु. ३२५०/- दरमहा
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वणी, मारेगाव, झरी व पांढरकवडा तालुक्यात (जि.यवतमाळ) वाघाचे बंदोवस्त करण्याबाबत**

**(३९) ४८१११ (०७-०५-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी, मारेगाव, झरी व पांढरकवडा तालुक्यात (जि.यवतमाळ) वाघाने शेत मजुराला ठार केल्यानंतर व अन्य पाळीव प्राण्यांवर हल्ला केल्यानंतर वाघाची दहशत तालुक्यांत पसरल्यामुळे शेतकरी व गुराखी शेतात जायला घाबरत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्यजीव विभागाने या नरभक्षी पट्टेदार वाघाचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी वन्यजीव विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार तातडीने सदरहू वाघाचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर वाघाचा बंदोबस्त करण्याबाबत परिसरातील ग्रामस्थांकडून निवेदन/अर्ज प्राप्त झाले आहेत.
(३) सदरहू वाघाचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने पांढरकवडा वनविभागामार्फत मोक्याच्या २ ठिकाणी पिंजरे लावण्यात आले आहे. वाघाचा मागोवा घेण्याकरीता रेस्क्यु टीम गठीत करण्यात आली आहे. वाघाच्या दहशतीमुळे ज्या ज्या गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले त्या त्या गावात मजूरांचे पथक तयार करुन वाघाच्या हालचालीचा मागोवा घेण्यात येतो. तसेच वन्यजीव-मानव संघर्ष टाळण्यासाठी लोकामध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

---

**वन्यजीव विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय मनुष्यबळासह नागपूरला स्थलांतरीत करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करणेबाबत**

**(४०) ४८१९८ (०७-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वन्यजीव विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय मनुष्यबळासह नागपूरला स्थलांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार प्रश्न भाग (१) बाबत पुनर्विचार करुन सदर कार्यालय नाशिक येथेच ठेवण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी ०५.१५/प्र.क्र. १५०/फ-१, दिनांक ३०.१२.२०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाचे कामकाज पार पाडण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक ह्या पदाचे नामकरण सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण असे करुन सदर पद व अनुषंगिक ११ पदे प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहेत. सदर प्राधिकरणाचे मुख्यालय नागपूर येथे ठेवण्यात आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) राज्य प्राणी संग्रहायल प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता असल्याने प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून सदर प्राधिकरणाकडे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक ह्यांच्या सेवा वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

**धुळे जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे ३ महिन्यापासून मानधन न मिळाल्याने**

**(४१) ४८६०२ (३०-०४-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे ३ महिन्यापासून मानधन न मिळाल्याने अंगणवाड्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधन वितरीत करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) नाही.

धुळे जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचा-यांचे मानधन माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंत अदा करण्यात आलेले आहेत. माहे मार्च, २०१६ चे मानधनाकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून माहे मार्च, २०१६ चे मानधन अदा करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी वन्यजीव अभयारण्य (जि.कोल्हापूर) या पर्यटन विकास आराखड्याला मंजूर मिळण्याबाबत**

**(४२) ४८७०५ (०३-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी वन्यजीव अभयारण्य (जि.कोल्हापूर) या पर्यटन विकास आराखडा तयार होऊन मंजूरीसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडे प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३० कोटी रुपयांच्या पर्यटन आराखड्याला मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :** (१) व (२) सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या ५ वर्षाच्या कालावधीसाठी राधानगरी अभयारण्याकरीता पर्यटन विकास कामातंर्गत रु.३०.०० कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय निसर्ग पर्यटन तज्ञ समितीच्या दिनांक १९.०९.२०१५ बैठकीत सदर आराखड्यात मंजूरी प्रदान केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भोरगिरी (ता.खेड, जि.पुणे) भीमाशंकर अभयारण्य येथे वन पर्यटन करणेबाबत**

**(४३) ४८९४६ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भोरगिरी (ता.खेड, जि.पुणे) भिमाशंकर अभयारण्य येथे वन विभागाच्या हद्दीत पुरातन शिवमंदिर व लेणी, निसर्गरम्य परिसर, वन पर्यटन करण्यासारखा परिसर असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोरगिरी येथे वन पर्यटन करणेबाबत मुख्य वनसंवरक्षक, पुणे यांनी प्रधान मुख्य वनसंवरक्षक, नागपूर (वन्यजीव) यांस माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव पाठविला आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०१६) :** (१), (२) व (३) भीमाशंकर अभयारयांतर्गत भोरगिरी येथे वन पर्यटन करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांनी दिनांक ०४.०२.२०१६ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर केला होता. सदर प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने तसेच सन २०१५-१६ ह्या आर्थिक वर्षाचा अल्प कालावधी शिल्लक असल्याने आराखडा मंजूर करण्यात आला नाही.

सन २०१६-१७ मध्ये भोरगिरी येथे वन पर्यटन करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांनी दिनांक ०६.०४.२०१६ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावतील कार्याबाबींची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन राज्यस्तरीय अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देऊळगांवराजा तालुक्यातील (जि.बुलडाणा) गोळेगांवर शिवारात रानडुकरांनी हैदोस घालून शेती पिकांचे नुकसान केल्याबाबत**

**(४४) ४९१७० (०७-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा तालुक्यातील (जि.बुलडाणा) गोळेगांवर शिवारात रानडुकरांनी मोठया प्रमाणात हैदोस घालून शेती पिकांचे नुकसान केल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रानडुकरांनी केलेल्या हल्ल्यात गोळेगाव येथील विमल श्यामराव एडके या कापूस वेचणीसाठी गेलेल्या शेतकऱ्यांच्या पायाचा लचका तोडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले,

(४) तदनुसार रानडुकरांच्या होणाऱ्या हल्ल्यास रोखण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) माहे डिसेंबर, २०१५ मध्ये मौजे गोळेगांव शिवारामध्ये वन्यप्राण्यांनी शेत पिकांचे नुकसान केल्याची ४ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) व (३) दिनांक १३.१२.२०१५ रोजी मौजे गोळेगांव येथील विमल श्यामराव एकडे यांचेवर रानडुकरानेक हल्ला करुन जखमी केल्याची घटना घडली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधित जखमी व्यक्तीस रु.१५,०००/- आदा करण्यात आले आहेत.

(४) वन्यप्राण्यांपासून होणारे हल्ले रोखण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात येतात.

- गावक-यांना वन्यप्राण्यापासून सावध राहण्याबाबत तसेच एकट्याने शेतामध्ये न जाण्याच्या सूचना देण्यात येतात.

- क्षेत्रीय कर्मचा-कडून नियमित सामुहिक गस्तीचे कार्यक्रम राबविण्यात येतात.
- वन्यप्राणी त्यांच्या नैसर्गिक अधिवास सोडून वस्तीमध्ये तसेच गावलगत शेतामध्ये येणार नाही याकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत अंतर्गत शेतीला कुंपण व शेतालगत टिसीएम घेण्याची कामे प्रस्तावित आहेत.

---

**भंडारातील जिल्ह्यातील बहूतांश अंगणवाडीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून संरक्षण भिंती व शौचालय अभावी अंगणवाड्या घाणीच्या विळख्यात सापडले असल्याबाबत**

**(४५) ४९३९४ (३०-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारातील जिल्ह्यातील बहूतांश अंगणवाडीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून संरक्षण भिंती व शौचालय अभावी अंगणवाड्या घाणीच्या विळख्यात सापडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालविकास प्रकल्प अधिकारी व ग्रामसेवक यांच्या दुर्लक्षामुळे सदर बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून त्यामुळे शासनाने दिलेल्या लाखो रुपयांचा निधीचा गैरवापर करण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधीचा गैरवापर करणाऱ्यांवर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई करणार आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवखाडा (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील वनक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यामुळे झालेला मृत्यु**

**(४६) ५१७४१ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवखाडा (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील पांडूरंग गेडाम यांचेवर डोंगरराव वनक्षेत्रात दिनांक २७ जानेवारी, २०१६६ रोजीच्या सुमारास वाघाच्या हल्ल्यामुळे मृत्यूमुखी पडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वाघाच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच मदत दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे काय,
(२) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास, त्यांच्या पत्नीस रक्कम रु.८,००,०००/- अदा करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वनपरिक्षेत्र अधिकारी बिहरगांव (वन्यजीव) (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) यांनी नाला सरळीकरण व खोलीकरणाचे काम ई निवीदा न काढता कामे केल्याबाबत**

**(४७) ५१९६४ (०७-०५-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वनपरिक्षेत्र अधिकारी बिहरगांव (वन्यजीव विभाग) (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) यांनी सन २०१५-१६ वन तपासनी नाका व लपणगृह आणि नाला सरळीकरण व खोलीकरणाची कामे करण्यासाठी शासन निर्णयानुसार ई निवीदा करणे गरजेचे आहे परंतु तसे न करता ही कामे तेथील वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी ही कामे स्वत:च्या मर्जीनी केल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याचे दिसून येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) अद्याप पर्यंत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) व (२) बिटरगांव परीक्षेत्रातील घमापूर तपासणी नाक्याचे बांधकाम ई निविदा पध्दतीने करण्यात आले आहे. सदर क्षेत्रात लपणगृहाचे कोणतेही काम करण्यात आले नाही.

नाला सरळीकरण व खोलीकरणाची रु.१२.४० लक्षची एकूण २१ कामे करण्यात आली आहेत. सदर कामे प्रत्येकी रु.६२,५००/- पेक्षा कमी असल्यामुळे स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून करण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथील वनपरिक्षेत्राच्या हद्दीतील काही वनक्षेत्रात परवानगी नसतानाही यांत्रिकी कामे केल्याबाबत**

**(४८) ५१९६५ (०७-०५-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड वनपरिक्षेत्रातील (जि.यवतमाळ) येथील वनपरिक्षेत्राच्या हद्दीतील मौजे मोरचंडी मुरली, सोनदाषी या बंदी भागातील वनक्षेत्रात यांत्रीकी कामे करण्याची परवानगी नसतांना देखील त्या परिक्षेत्रात यांत्रिकी कामे केली गेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिटरगांव वन्यजीव विभागामार्फत नाला सरळीकरण व खोलीकरणाची तब्बल रु.२२ लाख ची कामे बिटरगांवचे वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव विभाग) यांनी केली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अश्या प्रकारची कामे करीतांना महाराष्ट्र राज्य वन्यजीव कमिटीची पुर्व परवानगी घेतली आहे काय,
(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०६-२०१६) :** (१) यांत्रिकी कामे करण्याची परवानगी नाही, हे खरे नाही.
(२) बिटरगांव वनपरिक्षेत्रातील नाला सरळीकरण व खोलीकरणाची रु.१२.४० लक्षची कामे करण्यात आली आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात रानडुकरांच्या कळपांनी शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची मोठ्या प्रमाणात केलेले नुकसान

**(४९) ५२६७२ (०७-०५-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात रानडुकरांच्या कळपांनी शेतकऱ्यांचे गहू, ज्वारी, हरभरा, ऊस या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच यंदा पाऊस कमी असल्यामुळे रब्बी पिकांचे कमी प्रमाणात पेरणी झालेली असून रान डुकरांचे कळप रात्री पिकांची नासाडी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०६-२०१६) :**(१) बीड वन विभागात बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांचा समावेश आहे. बीड वन विभागात सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये (१५.०५.२०१६ पर्यंत) वन्यप्राण्यांद्वारे शेतपिकांचे नुकसान झाल्याची अनुक्रमे ४० व १४ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रस्तूत प्रकरणी संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार अनुक्रमे रु.१.३६ लक्ष व रु.०.६५ लक्ष रक्कम नुकसान भरपाई पोटी अदा करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे काय.

(३) वन्यप्राण्यांद्वारे शेतपिकांचे नुकसान झाल्याचे अर्ज प्राप्त होताच तात्काळ प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई पाटी आर्थिक सहाय्य आदा करण्यात येते. तसेच शेतपिकांचे नुकसान करणाऱ्या रानडुक्कर या वन्यप्राण्यांस मारण्याच्या कार्यपध्दतीत शासन परिपत्रक दि.२२.०७.२०१५ अन्वये सुलभीकरण करण्यात आले आहे. तसेच बीड, लातूर, उस्मानाबाद व जळगाव जिल्ह्यातील काही गावात एका वर्षासाठी रानडुक्कर व रोही ह्या प्राण्यास उपद्रवी (Vermin) घोषित करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील वन्यजीव विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपूर येथे स्थलांतरीत करण्यात आल्याबाबत**

**(५०) ५३२२७ (०७-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील वन्यजीव विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपूर येथे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील निर्णयाचा शासनाने पुनर्विचार करुन सदर कार्यालय पूर्ववत नाशिक येथे ठेवावे अशी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील निर्णयास विरोध म्हणून विविध राजकीय पक्ष व संघटनांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी सदर कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर तीव्र निदर्शने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने सदर कार्यालय नाशिक येथेच पूर्ववत ठेवण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

महसूल वन वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः- डब्ल्यूएलपी ०५.१५/प्र.क्र.१५०/फ-१, दिनांक ३०.१२.२०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाचे कामकाज पार पाडण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक ह्या पदाचे नामकरण सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण असे करुन सदर पद व अनुषंगिक ११ पदे प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहेत. सदर प्राधिकरणाचे मुख्यालय नागपूर येथे ठेवण्यात आलेले आहे.
(२) व (३) श्री.छगन भुजबळ, विधान सभा सदस्य यांनी दिनांक ३१.०१.२०१६ रोजी उपरोक्त आशयाचे निवेदन दिले आहे.

तसेच जिल्हाध्यक्ष, लोकसभा, युवक कॉग्रेस, नाशिक यांनी दिनांक ०२.०२.२०१६ रोजी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक यांचे कार्यालय नागपूर येथे हलविल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन दिले आहे. त्या अनुषंगाने समदिनांकास अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक ह्यांच्या कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर तीव्र निदर्शनेदेखील करण्यात आलेली आहेत.

(४) व (५) राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणा स्थापन करण्याची आवश्यकता असल्याने प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून सदर प्राधिकरणामुळे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक ह्यांच्या सेवा वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.